क्र.साप्रवि/रवक्र/न.क्र.८८९ /

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,

तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,

*मुंबई - ४०० ०१९.*

**महावितरण**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. १७३ दिनांक १६ / ०९ / २००८

विषय : 'वीज सेवक' कर्मचा-यांना कामावर असतांना अपघात झाल्यास 'विशेष विकलांग रजा' (Special Disabilty Leave) मंजूर करण्याबाबत.

संदर्भ : सामान्य आदेश क्र. १६२(क), दिनांक १५/०३/२००५.

......

सामान्य आदेश क्र. १६२ (क), दिनांक १५/०३/२००५ अन्वयें राबविण्यात आलेल्या स्वेच्छानिवृत्ती योजनेअंतर्गत नियुक्त केलेल्या वीज सेवकास महावितरण कंपनीचे काम करीत असतांना अपघात झाल्यास वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देण्याबाबतची तरतूद प्रशासकीय परिपत्रक क्र.९६ दि.०८/०२/२००७ नुसार करण्यात आली आहे. त्याच अनुरोधाने वीज सेवकास कंपनीचे काम करीत असताना अपघात झाल्यास वैद्यकीय उपचार घेण्यासाठी 'विशेष विकलांग रजा' मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचारधीन होता.

२. आता सर्वकष विचाराअंती व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक(संचलन) व संचालक(वित्त) यांच्याशी विचारविनिमय करुन सामान्य आदेश क्र. १६२(क), दिनांक १५/०३/२००५ अंतर्गत नियुक्त केलेल्या वीज सेवकास कंपनीचे काम करीत असतांना अपघात झाल्यास वैद्यकीय उपचारसाठी 'विशेष विकलांग रजा (Special Disability Leave)' देण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

३. या अनुषंगाने वीज सेवक या पदावर कार्यरत असलेले कर्मचारी म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेव विनियमाच्या सतराव्या सुचीतील तरतुदीनुसार 'विशेष विकलांग रजा' मिळण्यास पात्र राहतील.

४. सर्व क्षेत्रिय कार्यालयांच्या अखत्यारितील प्रलंबित प्रकरणे या तरतुदीनुसार निकाली काढावीत.

५. सामान्य आदेश क्र. १६२(क), दिनांक १५/०३/२००५ मधील इतर तरतुदी अबाधित राहतील.

६. सदर परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( सु.य.पाटील )*

*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :

१) क्षेत्रीय कार्यालयातील उप विभागीय आणि त्यावरील स्तराच्या कार्यालयांना
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

२) महावितरण कंपनीच्या निगम कार्यालयातील सर्व विभाग/कक्ष प्रमुख.

E:\Adm.Cir.Veej Sevak.doc